
‘आदिवासी भूषण पुरस्कार’ निमित्त

# गौरव विशेषांक

सन २००५-०६

## आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे



धरतीची लेकरं आम्ही... धरतीची रक्षा करु

हातात हात घेऊन... राष्ट्राचा विकास करु!



'आदिवासी भूषण पुरस्कार' निमित्त

# गौरव विशेषांक

## सन २००५-२००६

आदिवासी भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणारे मान्यवर

मा. कॉ. वाहरूजी सोनवणे

मा. ॲड्. मनोहरराव देशमुख

मा. श्री. पांडुरंगबाबा गांगड

दिनांक : रविवार, १८.०६.२००६ वेळ : दुपारी १२.०० वाजता

स्थळ : प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवडगाव, पुणे-४११०३३

## आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे.

मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २.६.२००६

# शुभेच्छा

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे यांच्यावतीने प्रदान करण्यात येणाऱ्या आदिवासी भूषण पुरस्कार निमित्ताने श्री. वाहरू सोनवणे, नंदुरबार, ॲड्. मनोहरराव देशमुख, अहमदनगर व श्री. पांडुरंगबाबा गांगड, नाशिक यांच्यावर आदिवासी भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे निमित्ताने कार्यगौरव विशेषांक प्रसिद्ध करीत आहे हे समजून आनंद वाटला.

महाराष्ट्राच्या दुर्गम आणि डोंगराळ भागातील आदिवासींना विकासाची दारे खुली करण्यात तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती व्हावी व त्यांचा मागासलेपणा दूर होऊन त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात एकरूप व्हावे यासाठी आदिवासी भूषण पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी प्रसिद्धीच्या झोतात न रहाता अबोल पद्धतीने प्रशंसनीय कार्य केले आहे. आदिवासी समाजासाठी सातत्याने झटून व शासनाने आखलेल्या योजनांचा आदिवासी समाजाच्या तळागाळापर्यंतच्या लोकांना जास्तीत जास्त लाभ कसा होईल असा प्रयत्न केलेला आहे.

पुढील सर्व वेळ ते आदिवासींच्या उन्नतीकरिता घालवतील अशी माझी अपेक्षा आहे. मी त्यांना दीर्घायुष्य इच्छितो.

आदिवासी समाज कृती समितीतर्फे आदिवासी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे.

गौरव विशेषांकास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

(प्रा. वसंत पुरके)

# आदिवासी भूषण पुरस्कार



मा. ॲड्. मनोहरराव देशमुख

# आदिवासी भूषण पुरस्कार

## ॥ सन्मानपत्र ॥

### मा. ॲड्. मनोहरराव देशमुख

*आपलं मूळ घराणं जरी अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यातील केळुंगण हे गाव असलं तरी काही कारणांस्तव वडिलांनी मुंबई येथे वास्तव्य केल्यानं आपला जन्म १९४३ मध्ये मुलुंड येथे नानासाहेब या कर्तव्यदक्ष व संस्कारी पित्याच्या पोटी झाला. १ ली ते ७ वी चे शिक्षण मुलुंड येथे, माध्यमिक ठाणे, तर महाविद्यालयीन शिक्षण रुईया कॉलेज, मुंबई येथून पूर्ण केले.*

*पुढे १९६५-६६ मध्ये एलएल.बी. परीक्षा पास झालात. वकिली व्यवसायाची सुरुवात मोठ्या कष्टाने व जिद्दीने केली. कोर्टाचे अनुभव घेतल्यावर 'परफेक्ट डॉक्युमेंटेशन' करण्यात प्रसिद्ध वकील असा नावलौकिक, तर दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती, कच्छी, सिंधी, पंजाबी, पारशी या बहुभाषा सफाईदारपणे बोलण्यात पारंगत. गरीब आदिवासी बांधवांची कायदेशीर कामे विनामोबदला करून देण्याचे व्रत स्वीकारले ते आजही सुरूच आहे. त्यासाठी आपण आठवड्यातून पूर्ण दिवस राखून ठेवला आहे.*

*१९७५-७६ सालातील गोष्ट आहे. आपल्या कार्याची ख्याती त्या वेळचे राज्यमंत्री श्री. रामू पटेल यांनी मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईकांच्या कानी घातली. त्यांनी मुक्तकंठाने स्तुती तर केलीच शिवाय प्रॉसिक्युटर, सिव्हिल जज्ज, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सभासदपद देऊ केले. पण ते आपण नाकारून आपला मोठेपणा सिद्ध केला. सामाजिक जाणिवेतून धर्मशाळा, वृद्धाश्रम बांधून कृतीतून व वाणीतून आपण समाजापुढे आदर्श ठेवला. राजूर येथील महाविद्यालयास भरीव मदत केल्याने ते आपल्याच नावाप्रमाणे प्रगतिपथावर जात आहे.*

*ॲड्. देशमुखसाहेब आपले पारदर्शक काम पाहून अनेक संस्था / संघटनांनी आपलंसं केलं. त्यांत मुलुंड रोटरी क्लब, जिमखाना, केअर फाउंडेशन ट्रस्ट, निर्मलादेवी चॅरिटेबल ट्रस्ट, इ. या सर्व संस्थांशी आपले सलोख्याचे ऋणानुबंध आहेत. राजकारणी लोकांच्या अडथळ्याने नैराश्य येत असले तरी समाजसेवेचे वेड स्वस्थ बसू देत नसल्याने आजही समाजाला गतिमान करत आहात. त्यातूनच अकोले-राजूर-इगतपुरी या भागांत आदिवासींसाठी चांगल्या शैक्षणिक संस्था उभ्या केल्या व त्यांना लाखो रुपयांच्या देणग्याही मिळवून दिल्या. आई-वडिलांची शिकवण आपण उभ्या आयुष्यात अमलात आणली. 'दान पेरावे तसे उगवते' या धारणेप्रमाणे आपण आजपर्यंत 'दान पेरण्याचे पुण्यमयी काम केले'. म्हणूनच अभिमानाने आदिवासी जनता म्हणते 'ॲड्. मनोहर देशमुखसाहेबांचा हात सदा जगन्नाथ'.*

*आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा विचार करून १९९४ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'आदिवासी सेवक', गुरु प्रतिष्ठानने 'समाजभूषण' तर अमेरिकेतील ABI, Who's Who या संस्थेने २००० या वर्षासाठीचा 'मॅन ऑफ दी यिअर' या मौलिक सन्मानाने गौरवून आपली कीर्ती थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर नेली. यापुढेही आपल्या कार्याची नोंद इतिहासात होईलच. मात्र कर्तव्यभावनेने आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे आपला 'आदिवासी भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करीत आहे. आपण त्याचा स्वीकार करावा, ही विनंती.*

| श्री. सीताराम जोशी | प्रा. एकनाथ बुरसे | श्री. सुदाम मराडे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

# आदिवासी समाज कृती समितीने दिलेले
# आदिवासी भूषण पुरस्कार

१ला आदिवासी भूषण पुरस्कार - १९९९



कै. डॉ. गोविंद गारे

२रा आदिवासी भूषण पुरस्कार - २०००



कॉम्रेड नजुबाई गावीत

३रा आदिवासी भूषण पुरस्कार - २००१



श्री. काळूराम दोधडे

४था आदिवासी भूषण पुरस्कार - २००२



मा. श्री. मधुकरराव पिचड, माजी मंत्री-आदिवासी विकास

*हार्दिक शुभेच्छा!*

# पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे

५३/१ब, विनायकनगर, गणपती चौक, नवी सांगवी, पुणे-४११०२७

☎: २७२८५१६३

**संपूर्ण संगणकीकृत**

## • कामकाज वेळ •

सोमवार ते शुक्रवार : दुपारी ४ ते सायं. ८

शनिवार व रविवार : स. ११ ते दु. ४

## • आमची मुख्य उद्दिष्टे •

• ठेवी वाढविणे • सभासद वाढविणे • जास्तीतजास्त सभासदांना कर्ज वितरण करणे •

•जास्तीतजास्त सभासदांना सहभागी करून घेण्यासाठी विभागवार एक दिवस संस्थेचे कामकाज चालविणे•

**• आकर्षक ठेव योजना - मुदत ठेव •**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ९० दिवस | ६.५% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५% |
| ९१ ते १८० दिवस | ७.५% |
| १ वर्ष ते २ वर्षे | १०.०% |
| २ वर्षापेक्षा जास्त | ११.०% |

## • संचालक मंडळातर्फे •

सौ. रंजना मोरमारे — अध्यक्षा

श्री. निवृत्ती उतळे — उपाध्यक्ष

श्री. दुंदा मोरे — मानद सचिव

## • संचालक सदस्य •

श्री. विजय डगळे

श्री. राजेंद्र पोटकुले

डॉ. पोपट जोशी

श्री. राजेंद्र रेंगडे

श्री. केशव चिमटे

श्री. मधुकर कोकणे

श्री. शांताराम मोईर

श्री. मुकुंद मोरमारे

श्री. योगेश साबळे

सौ. आशा दाते (महिला संचालक)